| MHNS290020522023 | हनुमंता यादव बांगर<br>वि.<br>ठमा गणपत व इतर |
|---|---|

**<u>सामाईक आदेश निशाणी क्र.३७ आणि ३८ वर</u>**

**<u>विशेष दिवाणी दावा क्र.३६०/२०२३</u>**

( जुना विशेष दिवाणी दावा क्र.०७/२०१८ )

प्रस्तुतचे अर्ज वादीतर्फे देण्यात आलेले आहेत. निशाणी ३७ वरील अर्ज प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेणेकामी झालेला उशीर माफ होण्यासाठी तसेच, निशाणी ३८ वरील अर्ज प्रतिवादी क्र.१ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी दाखल केला आहे.

२. सदरचे अर्जांमध्ये वादी असे कथन करतात की, प्रस्तुत दाव्याचे कामकाज प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र.१ ठमा गणपत आगीवले हे दि.३०.०४.२०१९ रोजी मोजे परदेशवाडी, ता.इगतपुरी, जि.नाशिक येथे मयत झाले. दरम्यानच्या काळात कोविड या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव सुरू झाल्याने वादीस त्यांची माहिती मिळू शकली नाही. तसेच प्रतिवादी क्र.१ यांचा मृत्युचा दाखला मिळणेकामी वादी यांना उशिर झाला. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ हे मयत झाल्यानंतर मुदतीत त्यांच्या वारसांची नावे अभिलेखावर घेता आली नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेणेस झालेला उशीर माफ होवून त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी प्रस्तुतचे अर्ज दिले आहेत.

३. अभिलेखाचे व प्रस्तुत अर्जांचे अवलोकन करता, प्रतिवादी क्र.१ ठमा गणपत आगीवले यांचे दि.३०.०४.२०१९ मध्ये निधन झाल्याचे आढळते. त्या संदर्भातील त्यांचा मृत्युचा दाखला देखील अभिलेखावर दाखल केल्याचे दिसते. करीता, प्रस्तुत अर्जातील कारणांचा विचार करता व प्रस्तुतचा दावा गुणदोषावर चालविण्यासाठी निशाणी ३८ मध्ये नमूद केलेले प्रतिवादी क्र.१ यांचे

वारस अभिलेखावर घेणे गरजेचे वाटते व प्रतिवादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला उशीरास योग्य त्या खर्चाची रक्कम लावून माफ करणे उचित वाटते. सबब, पुढील आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

१. निशाणी ३७ व निशाणी ३८ वरील अर्ज रू.१,०००/— (अक्षरी रूपये एक हजार मात्र) खर्च तालुका विधी सेवा समिती, इगतपुरी येथे भरण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतात.

२. वरील आदेशाची पुर्तता झाल्यानंतर प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात येते.

सही/—
( माधव एस. बोराळे )
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, इगतपुरी.

दि.१५.१२.२०२३.

(J.O. Code :- MH02022)

*Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app “**eCourts Services**” from Android or iOS*